# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर | वर्ष ४ थे | अंक ३२ वा | मंगळवार दि.०२ जूलैं २०२४ | पृष्ठे ४ | स्वागत मूल्य २ रू.



Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Racold legrand HAVELLS INDOASIAN Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com


# हिंदूवरील भाषणावरुन लोकसभेत गदारोळ

नवी दिल्ली : आज लोकसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर चर्चा चालू आहे. या चर्चेच्या दरम्यान, विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी भाषणाची सुरुवात केली आणि संविधानाच्या आधारे मोदी सरकारवर जोरदार हल्ला चढवला. त्यांनी आपल्या भाषणाची सुरुवात संविधानाची प्रत हातात घेऊन केली. या दरम्यान, राहुल गांधी यांनी एक विधान केले ज्यामुळे वाद निर्माण झाला. या विधानावर पीएम मोदींनी उभे राहून विरोध दर्शवला आणि संपूर्ण हिंदू समाजाला हिंसक म्हणणे गंभीर बाब असल्याचे सांगितले.

राहुल गांधींनी आपल्या भाषणात म्हटले, मोदीजींनी एका भाषणात सांगितले की हिंदुस्तानने कधीही कोणावर हल्ला केला नाही. कारण, हिंदुस्तान हा अहिंसेचा देश आहे, तो घाबरत नाही. आमच्या महापुरुषांनी हे संदेश दिले - डरो मत, डराओ मत. शिवजी म्हणतात - डरो मत, डराओ मत दुसरीकडे, जे लोक स्वत:ला हिंदू म्हणतात ते २४ तास हिंसा-हिंसा, नफरत-नफरत करतात. तुम्ही हिंदू नाही. हिंदू धर्मात स्पष्टपणे लिहिले आहे की सत्याचा साथ द्यावा.राहुल गांधींनी आरोप लावला की त्यांच्यावर खोटे खटले चालवले गेले. ईडीने त्यांची चौकशी केली, त्यावेळी अधिकारीही हैराण झाले. इंडिया आघाडीच्या नेत्यांना जेलमध्ये ठेवण्यात आले. ओबीसी-एससी-एसटी वर्गाच्या हक्कांची बाजू मांडणा-यांवर -यांवर खटले दाखल केले जात आहेत.

राहुल गांधींनी दाखवला महादेवाचा फोटो जेव्हा तुमच्यावर असे हल्ले होतात तेव्हा तुम्हाला आश्रय हवा असतो, असे राहुल गांधी म्हणाले. त्यामुळे आज मी भाजप-



आरएसएसच्या लोकांना सांगू इच्छितो की, ज्या कल्पनेने आम्ही आणि संपूर्ण विरोधकांनी आमचा बचाव कसा केला. ही कल्पना कुठून आली आणि सरकारशी लढण्याची हिंमत कशी आली? यानंतर राहुलने भगवान महादेवाचा फोटो काढला आणि आम्ही येथे आश्रय घेतल्याचे सांगितले. यावेळी विरोधी पक्षाच्या खासदारांनी जय महादेवच्या घोषणा दिल्या.

राहुल गांधींनी भगवान शिव यांना प्रेरणा मानत, विपरीत परिस्थितीत संघर्ष करण्याची प्रेरणा मिळाली असल्याचे सांगितले. त्यांच्या डावा हातातील त्रिशूल अहिंसेचे प्रतीक आहे. आम्ही सत्याची रक्षा केली आहे कुठल्याही हिंसा न करता. भाजपावर टीका करताना राहुल गांधी म्हणाले की, त्यांच्या दृष्टीने केवळ सत्ता महत्वाची आहे.

बिरला यांनी राहुल गांधींना थांबविले राहुल गांधींनी लोकसभेत आपल्या संबोधनादरम्यान भगवान महादेवाचा फोटो दाखवला. यावर स्पीकर ओम बिरला यांनी त्यांना थांबवले नियम पुस्तिका काढली. राहुल गांधी म्हणाले की, सदनात आम्ही शिवजीचा फोटोही दाखवू शकत नाही का?, तुम्ही मला थांबवत आहात. माझ्याकडे आणखीही फोटो होते जे दाखवून सांगायचे होते की शिवजींनी कसे रक्षण केले.

जय संविधानाने सुरूवात लोकसभेत राहुल गांधी बोलत होते. त्यांनी जय संविधान म्हणत आपले भाषण सुरू केले आणि म्हणाले की, छान वाटते की प्रत्येक दोन-तीन मिनिटांनी भाजपाचे लोक संविधान-संविधान म्हणत आहेत. आम्ही देशाच्या लोकांसोबत मिळून त्याची रक्षा केली आहे. संपूर्ण विरोधक 'आयडिया ऑफ इंडिया' चे संरक्षण करत आहेत.

# तलाठ्यांची ललाटी मारणारे डीआर शिंदे कन्हेरीसह आर्वी चे तलाठी

लातूर :- तलाठी डी आर शिंदे हे लातूर येथे एक, दोन, तीन, चार या सज्ञाचे तलाठी होते. तलाठी यांनी सातबारावर एकही रेषा ओढली नाही तरी खुट्टी कोणीही काढू शकत नाही. रद्द करू शकत नाही. शेवटी उच्चपदस्थानाच तलाठी साहेब ही रेषा कशाबद्दल म्हणून चौकशी करावी लागते त्यावेळी ती रेषा चर्चेविना गायब केली जाते त्यांचे नाव तलाठी असते. म्हणूनच तलाठी डी आर शिंदे हे लातूर सोडून लातूरच्या कुशीत असलेल्या कन्हेरीचे तलाठी म्हणून बदलून गेले परंतु तलाठ्यांची ललाटी महत्त्वाची असते म्हणूनच की काय डी आर शिंदे यांच्याकडेच पुन्हा वाढीव प्रभारी कारभार आर्वीचे तलाठी म्हणून दिला गेल्याने प्रभारीसाठी एकमेव पात्र तलाठी म्हणजे डी आर शिंदे हेच सूत्र महसूल विभागाने ठरविले



असावे अशी चर्चा तलाठी कर्मचारी महासंघात होताना दिसते आहे . आर्वी हे गाव तसेच चांगले पण लातूरच्या वेशीला टांगलेले असल्याने मी की तू अशी स्पर्धा लागली होती पण ललाटी मारण्यात तरबेज असलेले डी आर शिंदे यांनीच बाजी मारून आर्वीचा प्रभारी कारभार स्वीकारला असून लातूर शहर व लगतच्या गाव सज्ञाना डी आर शिंदे यांच्याशिवाय कर्तबगार तलाठी कोणीच असू शकत नाही अशी प्रतिक्रिया महसूल विभागात होताना दिसते आहे.

# नागराज मंजुळेंना नकार देणे चुकीचे होते

मुंबई : मराठी सिनेसृष्टीत अशा अनेक अभिनेत्री आहेत ज्या काही चित्रपटांमध्ये दमदार कामगिरी करतात मात्र त्यानंतर अचानक सिनेसृष्टीतून गायब होतात. अशीच एक अभिनेत्री म्हणजे मिताली जगताप. 'वादळवाट', 'एक धागा सुखाचा' अशा मालिकांमधून प्रेक्षकांच्या मनाचा ठाव घेणारी मिताली २०१२ नंतर अभिनय क्षेत्रातून गायब झाली. तिने 'बाबू बँड बाजा' या चित्रपटासाठी राष्ट्रीय पुरस्कार पटकावला होता. मात्र त्यानंतर तिने सगळ्यातून काढता पाय घेतला. आता ती पुन्हा एकदा कलर्स मराठीच्या 'अबीर गुलाल' या मालिकेत दिसतेय. त्यानिमित्ताने नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत तिने एक खंत व्यक्त केली आहे. मितालीने नुकतीच 'इट्स मज्जा' या युट्यूब चॅनेलला मुलाखत दिली. या मुलाखतीत बोलताना तिने नागराज मंजुळे यांच्या चित्रपटाबद्दलचा किस्सा सांगितला. आपल्याला विचारणा तर झाली होती मात्र आपण ती संधी गमावल्याचे आजही वाईट वाटते असं ती म्हणाली.



याबद्दल बोलताना ती म्हणाली, '२०१२ पासून माझ्या मनात एक गोष्ट आहे. मला त्याबद्दल कायम वाईट वाटत आले आहे. एक सुंदर अशी कलाकृती होती. दिग्दर्शक नागराज मंजुळे यांची होती. पण मी काही वैयक्तिक कारणामुळे माघार घेतली. अगदी उद्या चित्रीकरण आहे आणि आदल्या रात्री मी नाही येऊ शकत असे सांगितले. कारण माझी मुलगी आजारी होती. मिताली पुढे म्हणाली, जर ती एक कलाकृती मी केली असती तर माझ्या आयुष्यात खूप काही झाले असते. आताची पिढी ही थोडीशी प्रॅक्टिकल आहे. मी संभाजी नगरसारख्या शहरातून मुंबईत एकटी आले. खूप कष्ट करुन मी स्वत: स्थान निर्माण केले. लग्नानंतर माझ्या आयुष्यात एक सोनेरी काळ आला. तो म्हणजे मी आई झाले. एक कलाकार म्हणून मी या गोष्टीला भारावून जायला नको होतं जे मी गेले. माझ्यासाठी माझी लेक पहिलं प्राधान्य आहे. ज्यावेळी असे वाटले की त्या छोट्याशा जीवाला माझी गरज आहे तेव्हा मी कसलाच विचार केला नाही. तिने पुढे सांगितले माझा नवराही याच क्षेत्रात आहे. आम्हीच सकाळी ७ ला घर सोडले तर रात्री ११ ला घरी येणार. त्यामुळे माझं इतकंच म्हणणे होते की, आम्हा दोघांपैकी एकाचा चेहरा तरी तिला दिसावा. अशावेळी मी नव-याला म्हटले की तू कर मी ब्रेक घेते. ज्यावेळी तिला माझी गरज पडली तेव्हा मी तिच्याबरोबर होते त्यामुळे करिअरमधील एक संधी मला सोडावी लागली. जे होतं ते चांगल्यासाठी होतं.

# भाजपकडून विधान परिषदेसाठी ५ उमेदवार जाहीर, पंकजा मुंडेंना संधी तर जानकरांना डावलले

महाराष्ट्र विधान परिषद निवडणुकीसाठी भाजपने सोमवारी (दि.१ जुलै) ५ उमेदवारांची यादी जाहीर केली. भाजपने पंकजा मुंडे यांना विधानपरिषदेसाठी संधी दिली आहे. तसेच भाजपच्या उमेदवारांच्या यादीत सदाभाऊ खोत यांच्याही नावाचा समावेश आहे. योगेश टिळेकर, डॉ. परिणय फुके, अमित गोरखे यांचीही भाजपने विधान परिषदेसाठी उमेवारी जाहीर केली आहे.राज्यात होत असलेल्या विधान परिषद निवडणुकांसाठी भाजपने आपले ५ उमेदवार जाहीर केले. यामध्ये राज्यातील माजी मंत्री पंकजा मुंडे, डॉ. परिणय फुके, माजी आमदार योगेश टिळेकर, अमित गोरखे यांना तर मित्र पक्षांचे सदाभाऊ खोत असे एकूण ५ उमेदवार जाहीर केले. राज्यात १२ जुलै रोजी विधान परिषदेच्या ११ जागांसाठी निवडणूक होत आहे. या निवडणुकीसाठी भाजपने आपले ५ उमेदवार जाहीर केले.

विधान परिषद निवडणुकीवरून काँग्रेस-शिवसेनेत वाद महादेव जानकर यांचा पत्ता कट भाजपच्या वतीने विधानपरिषद उमेदवारीसाठी चर्चेत असलेल्या नावांपैकी पंकजा मुंडे, परिणय फुके, योगेश टिळेकर, अमित गोरखे यांना उमेदवारी मिळाली. मात्र राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव जानकर यांचा पत्ता यामध्ये कट झाला तर रयत क्रांती संघटनेचे सदाभाऊ खोत यांना भाजपने विधान परिषदेची उमेदवारी दिली. आगामी विधानसभा निवडणुकीचा विचार करून महाराष्ट्र राज्यातील सामाजिक, राजकीय आणि प्रादेशिक समीकरणे साधण्याचा प्रयत्न यामध्ये भाजपने केला आहे.पंकजा मुंडे यांना पुन्हा संधी भाजपच्या कोट्यातील ५ जागांसाठी जवळपास ११ लोकांची नावे चर्चेत होती. लोकसभा निवडणुकीत बीड लोकसभा मतदारसंघातून पंकजा मुंडे यांचा पराभव झाला. यानंतर राज्यात होत असलेल्या विधानसभा निवडणुकीपूर्वी भाजपने पंकजा मुंडे यांना विधान परिषदेची उमेदवारी दिली. भाजपचे संख्याबळ पाहता पंकजा मुंडे यांचे निवडून येणे निश्चित आहे. पंकजा मुंडेंसोबतच भाजपच्या कोट्यातून पुन्हा एकदा रासपचे अध्यक्ष महादेव जानकर यांना संधी मिळणार, असे भाजपमधील सुत्रांचे म्हणणे होते.

परंतु राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव जानकर यांच्या ठिकाणी रयत क्रांती संघटनेचे सदाभाऊ खोत यांना उमेदवारी देण्यात आली. त्यामुळे लोकसभा निवडणुकीत पराभूत झालेल्या पंकजा मुंडे यांना विधान परिषदेवर संधी मिळाली मात्र महादेव जानकर यांना ती मिळू शकली नाही. महादेव जानकरासंह माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, आमदार निलय नाईक, भाजप महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ, भाजप नेत्या माधवी नाईक यांचीही नावे विधान परिषदेसाठी चर्चेत होती.

# लातूर तालुक्यातील हरंगुळ येथील भाग्यश्री सूर्यकांत सुडे यांच्या अमानुष खुनाचा खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवावा माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांची स्थगन प्रस्तावाव्दारे सभागृहात मागणी

लातुर / प्रतिनिधी : - लातूर तालुक्यातील हरंगुळ येथील कन्या भाग्यश्री सूर्यकांत सुडे ही पुणे येथे अभियांत्रिकीचे शिक्षण घेत होती, ३० मार्च २०२४ रोजी तिचे पुणे येथून अपहरण करून निर्घृण खून करण्यात आला. या अमानुष खुनाचा खटला चालविण्यासाठी फास्टट्रॅक कोर्ट स्थापन व्हावे, सदरील फास्टट्रॅक कोर्ट लातूर येथे चालवून आरोपींना लवकरात लवकर शिक्षा व्हावी, अशी मागणी महाराष्ट्र विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान स्थगन प्रस्तावाव्दारे राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केली आहे. या संदर्भाने सभागृह अध्यक्ष राहूल नार्वेकर यांनी या मागणीची शासनाने तातडीने दखल घेऊन कार्यवाही करावी असे निर्देश दिले आहेत. मुंबई येथे महाराष्ट्र विधीमंडळाचे पावसाळी अधिवेशन सुरु आहे. या अधिवेशनात माजी मंत्री आमदार आमदार अमित विलासराव देशमुख यांनी सोमवार १ जूलै रोजी स्थगनप्रस्ताव मांडून लातूर तालुक्यातील हरंगुळ येथील सूर्यकांत सुडे हे आपले सहकारी असून आपल्या सोबत संस्थेत कार्यरत आहेत. त्यांची कन्या भाग्यश्री सुडे ही पुणे येथे अभियांत्रीकीचे शिक्षण घेत होती तिचे अपहरण करून तिचा निर्घृण खून करण्यात आला आहे. यातून राज्यातील महीलाच्या सुरक्षीततेचा मोठा प्रश्न निर्माण झाल्याचे दिसून येत आहे असे सांगीतले. यावेळी सभागृहात बोलतांना पुढे बोलतांना आमदार देशमुख



म्हणाले, लातूर येथील सर्वपक्षीय पदाधिकारी यांच्यासह यलम समाज बांधवाची अशी मागणी आहे की, या अमानुष खुनाचा खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवून आरोपींना लवकरात लवकर शिक्षा व्हावी. या मागणीकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शुक्रवार दि. १२ एप्रिल २०२४ रोजी लातूरकरांनी लातूर शहरात मोर्चा काढला होता. राज्यात पुन्हा अशा प्रकारच्या घटना होऊ नयेत म्हणून राज्य शासनाने खबरदारी घ्यावी, भाग्यश्री सुडेचा अपहरण व खुनाचा खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवावा, सदरील फास्टट्रॅक कोर्ट लातूरात चालावे अशी मागणी केली. या प्रस्तावाची दखल घेऊन यावेळी सभागृह अध्यक्ष राहूल नार्वेकर यांनी या सरकारने गाभीर्याने विचार करुन तातडीने कार्यवाही करावी असे निर्देश शासनाला दिले आहेत.

# लातूर मनपा क्षेत्रीय अधिकाऱ्यांना वाहनाची गरजच काय?

लातूर :- लातूर शहर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती नाजूक आहे. कर्मचाऱ्यांच्या पगारांना ही पैसे नसतात केवळ नागरी करातून मनपाचा कारभार चालत असतो त्यात आयुक्ता व्यतिरिक्त कोणाकडेही शासकीय वाहन नसून उपायुक्त विभाग प्रमुख, अभियंता वगैरे भाड्याच्या वाहनातूनच कारभार करीत असतात मग झोन मध्ये बसून कारभार करणाऱ्या लातूर शहरातील झोनच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांना वाहनाची गरजच काय अशी संतप्त प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांतून व्यक्त होताना दिसते आहे. शासन नियुक्त अधिकारी कर्मचारी वगळता इतरांचा पगार वेळेवर तर होतच नाही परंतु दोन-तीन महिन्यावर होत असतो ही परिस्थिती अवगत असताना आमच्या बापाचे काय काय जाते लोक करातून वाहन खर्च भागतो म्हणून जनतेच्या पैशाची अशी लूट आणि तीही क्षेत्रीय अधिकारी यांच्या घरातून ऑफिस आणि ऑफिस मधून घरी जाण्यासाठी भाड्याने वाहन कशी काय वापरली जातात या संदर्भात मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे आणि जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर- घुगे यांनी लक्ष घालून संबंधितांची वाहने वापरण्यावर बंदी घालावे अशी मागणी होताना दिसते आहे.

## संपादकीय....

# शोधीत विठ्ठला जाऊ आता!

महाराष्ट्राची झपाट्याने होणारी घसरण रोखणे अत्यावश्यक, याची जाणीव महाराष्ट्राच्या राज्यकर्त्यांना असल्याचे ताज्या अर्थसंकल्पातून दिसत नाही एकेकाळी महाराष्ट्र केंद्रानेही अनुकरण करावे अशा प्रागतिक योजना देण्यासाठी ओळखला जात असे. मग ती वि. स. पागे यांची सत्तरच्या दशकात साकारलेली रोजगार हमी योजना असो वा महिलांस राखीव जागा देणारी शरद पवार यांनी यशस्वीपणे राबवलेली योजना असो! तो काळ लोटला. अलीकडचा महाराष्ट्र हा अनुकरण करणारा– हिंदी भाषक राज्यांची कॉपी करणारा– बनू लागला असून मुख्यमंत्री यांची ताजी 'लाडकी बहीण' योजना हा त्याचा एक नमुना. तसेच 'तीर्थक्षेत्र यात्रा' ही कल्पना आणि मुख्यमंत्र्यांच्या समर्थकांचा शिंदे यांस महाराष्ट्राचा 'बुलडोझर बाबा' बनवण्याचा हुच्चपणा हेदेखील अशा कॉपी करणाऱ्या महाराष्ट्राचे नमुने. हे सर्व एकवेळ क्षम्य ठरवता आले असतेही! कधी? जर महाराष्ट्र औद्योगिक, आर्थिक क्षेत्रात आपले आघाडीचे निर्विवाद स्थान राखू शकला असता तर! पण तसे नाही. आर्थिक, सामाजिक आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे शैक्षणिक आघाडीवर महाराष्ट्र झपाट्याने रसातळास निघालेला असताना आणि ही घसरण थांबवणे अत्यावश्यक असताना त्याची कसलीही जाणीव राज्यकर्त्यांस नसणे हे अधिक वेदनादायक ठरते. महाराष्ट्राचा ताजा अर्थसंकल्प हा अशा जाणीवशून्यतेचा ताजा नमुना! राज्यास प्रगतिपथावर नेईल अशी नवी कल्पना, नवा विचार यांचा अभाव असलेल्या या अर्थसंकल्पाचे विश्लेषण करू गेल्यास वास्तवाच्या वेदनेस चिंता येऊन मिळते आणि महाराष्ट्राच्या भवितव्याविषयीचे प्रश्नचिन्ह अधिकच मोठे होते.

यामागे केवळ राज्याच्या डोक्यावरील कर्ज इतकेच कारण नाही. तर महसूल येणार कोठून याची कोणतीही कल्पना नसताना जाहीर केल्या गेलेल्या भारंभार योजना, हे आहे. त्यात हा तर निवडणुकीच्या तोंडावरचा अर्थसंकल्प, म्हणजे किमान अर्थविवेकाची अपेक्षा बाळगणेही वेडेपणाचे. वित्तीय तूट एक लाख दहा हजार कोटी रुपयांहून अधिक, महसुली तूट २० हजार कोटी रु. आणि तरीही राज्याच्या तिजोरीवर आणखी लाखभर कोटी रुपयांचा भार नवनव्या योजनांमुळे पडणार असेल तर यासाठी लागणारा पैसा येणार कोठून हा तर शालेय पातळीवर पडू शकेल असा प्रश्न. पण अर्थसंकल्पोत्तर वार्ताहर परिषदेत तो विचारला गेला म्हणून अर्थमंत्री रागावले. यावर साध्या उत्तरातून त्यांस वेळ मारून नेता आली असती. पण तसे न करता ते स्वतःचा, दुसरे सह–उपमुख्यमंत्री तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रशासकीय अनुभवाचा दाखला देते झाले. क्षेत्र कोणतेही असो. भूतकाळातील– तीही कथित– कार्यक्षमता ही भविष्यातील आश्वासक कामगिरीची हमी देणारी असतेच असे नाही, हे वास्तव. राजकारणात तर ते अधिकच खरे ठरताना दिसते. या क्षेत्रात भरवशाच्या कित्येक म्हशींनी प्रसवलेल्या टोणग्यांचे तांडेच्या तांडे रानोमाळ फिरताना महाराष्ट्र अनुभवतो आहे. तेव्हा या मंडळींच्या अर्थसंकल्पाच्या वास्तविकतेबाबत प्रश्न निर्माण न होणे अवघड. हे वास्तव अर्थसंकल्पविषयक प्रसृत केलेल्या तपशिलांतून समोर येते. त्यानुसार आपल्याकडे या नवनव्या जनप्रिय योजना राबवण्यासाठी पैसे नाहीत हे राज्य सरकार अप्रत्यक्षपणे मान्य करते. नपेक्षा आणखी लाख कोटभर रुपये कर्जाऊ उचलण्याची गरज व्यक्त होती ना! ग्यानबाच्या अर्थशास्त्रात यास 'ऋण काढून सण करणे' असे म्हणतात. या अशा मुबलक सण महोत्सवांचे आश्वासन ताज्या अर्थसंकल्पातून भरपेट मिळते. त्याने फार तर कदाचित राजकीय समाधान मिळेल. पण तेही कदाचित आणि मिळाले तरी क्षणिक असेल हे निश्चित. हे ठामपणे म्हणता येते याचे कारण लोकसभा निवडणुकांचे ताजे निकाल.

अलीकडे जनतेच्या पैशाने धर्मार्थ खर्च करण्याची चढाओढ राज्यकर्त्यांत लागल्याचे दिसते. यांस हे अर्ध–समाजवादी राज्यकर्ते 'जनकल्याण योजना' असे गोंडस नाव देतात. गरिबांस संपत्तीनिर्मितीत सहभागी करून घेता येत नसेल तर करदात्यांच्या पैशावर धर्मशाळा चालवून त्यांस पोटापाण्यास चार घास मिळतील अशी व्यवस्था करणे म्हणजे जनकल्याण असे मानले जाण्याचा हा काळ. पण या अशा धर्मशाळा या शाश्वत संपत्तीनिर्मितीस पर्याय ठरू शकत नाहीत. तसेच या असल्या तथाकथित जनकल्याणावर जनता खूश होऊन मतांची भिक्षा सत्ताधीशांच्या झोळीत टाकते असेही नाही. तसे असते तर अशा योजनांचा खच अंगणात पडलेला असताना केंद्रीय सत्ताधारी भाजप किमान बहुमतापासूनही चार हात दूरवर रोखला गेला नसता. हे वास्तवही त्याच भाजपच्या सहभागाने सत्तेत असलेल्या राज्यातील आघाडीस दिसू नये, हे आश्चर्य. कदाचित जनतेवर दौलतजादा केला की ती आपणावर मतांची खैरात करते असा काही भ्रम राज्यकर्त्यांस असावा. या दौलतजादाच्या बरोबरीने संपत्तीनिर्मिती, उद्यामशीलता आदी आघाड्यांवर काही भरीव तरतुदी नसतील तर हा भ्रमाचा भोपळा निवडणुकीत फुटू शकतो. लोकसभा निवडणुकांत ते दिसून आले. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील वाढते विकृत शहरीकरण, या लादलेल्या शहरीकरणामुळे शहराशहरांत प्रचंड वेगाने वाढती बेरोजगारी, याच्या जोडीने कृषी क्षेत्राचे तितक्याच गतीने वाढते बकाली आणि बेकारीकरण यामुळे महाराष्ट्राची पहिल्या क्रमांकावरून 'दरडोई सकल राज्य उत्पादना'बाबत सहाव्या क्रमांकावर झालेली घसरण, कर्नाटक–गुजरात–तेलंगण–आंध्र–तमिळनाडू–कर्नाटक या राज्यांच्या तुलनेत मंदावलेला औद्योगिक विकास याचे कसलेही प्रतिबिंब या अर्थसंकल्पात नाही. याच्या जोडीने केवळ सरकारी नोकऱ्यांवर आशा असलेले कोट्यवधी तरुण परिस्थितीचे गांभीर्य अधिकच अधोरेखित करतात. या अशा विविध प्रगती–वंचितांस राज्याचा अर्थसंकल्प काय देतो?

लाडकी बहीण, या बहिणीच्या बेरोजगार भावास अल्प पाठ्यवेतनावर सरकारी योजनांचा प्रसारक बनण्याची संधी आणि त्यांच्या आईवडिलांसोबत देवदर्शनाची हमी. यातील पहिलीचे ठीक. मध्य प्रदेशच्या शिवराज सिंह चौहान यांस या लाडक्या बहिणींनी हात दिला, म्हणून तिचे अनुकरण असे म्हणता येईल. पण दुसरी योजना ही तर केवळ सत्ताधारी नेत्यांमागे 'हम तुम्हारे साथ है' बोंबलत घसे कोरडे करत अहोरात्र हिंडणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी आहे हे लक्षात न येणे अवघड.


# कृषीदिनाचा बांधापर्यंतचा प्रवास!

या दिवशी कृषीसंस्कृतीचे संस्मरण करून कृषीसंस्कृतीच्या समृद्धीसाठी संकल्प केल्या जाते. हा पर्व थेट बांधावर, शेत शिवारातही साजरा होत असून यात शेतकरी सन्मान, समुपदेशन, फळझाडांची लागवड व शेतकऱ्यांचे भाग्यविधाते महानायक वसंतराव नाईकांना आदरांजली अशा विविध स्वरूपात साजरा केला जातो. थेट शेत बांधावर शेतकऱ्याप्रति कृतज्ञता व्यक्त केली जावी, शेतकऱ्यांना आत्महत्यापासून परावृत्त करून आत्मबळ मिळावे. आधुनिक शेती तंत्राचा जागर व्हावा, शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक व्हावा व शेतकऱ्यांप्रति कृतज्ञता व्यक्त केली जावी, हाच सार्थ उद्देश. श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजींचा बोधप्रद संकलित लेख कृषिबांधवांच्या सेवेत.... संपादक.

आज १ जुलै रोजी भारत या कृषीप्रधान देशातला कृषी आणि कृषकांचा– शेतकऱ्यांचा पावन पर्व आहे. कृषि दिन हा कृषीप्रधान देशाचा एक पावन पर्व मानला जातो. त्यामुळे कृषी दिनाला विशेष असे महत्त्व आहे. कृषी दिन १ जुलै रोजी हरितक्रांतीचे जनक महानायक वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त शासन स्तरावर साजरा केला जातो. याच दिवशी अन्नदाता शेतकऱ्यांचा सर्वत्र सन्मान केला जातो. तसेच शेती आणि मातीवर निस्सीम भक्ती असणारे जागतिक ख्यातीचे कृषीतज्ञ व प्रगतशील शेतकरी महानायक वसंतराव नाईक यांना आदरांजली अर्पण केल्या जाते. महानायक वसंतराव नाईक यांचे लोकशाही सक्षमीकरण, ग्रामीण विकास व विशेषतः कृषी औद्योगिक क्षेत्रातील क्रांतिकारी योगदानामुळे त्यांना महानायक, शेतकऱ्यांचा जाणता राजा म्हणूनही संबोधले जाते. भारताचे राष्ट्रपती, भारतरत्न डॉ.प्रणव मुखर्जी यांनी वसंतराव नाईक हे भारत मातेचे थोर सुपूत्र आहे. या शब्दात नाईकांचे गौरव केले. तसेच थेट शेतकऱ्यांच्या बांधावर मोहिमेचे प्रवर्तक, विचारवंत एकनाथराव पवार यांनी आधुनिक कृषीप्रधान भारताचे कृषीसंत या शब्दात महानायक वसंतराव नाईक यांचे वर्णन केले आहे.

भारतीय आधुनिक कृषी क्षेत्रात क्रांतिकारी योगदान असलेल्या आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कृषी तज्ञ व पहिले शेतकरी मुख्यमंत्री, हरितक्रांतीचे जनक महानायक वसंतराव नाईक यांची जयंती कृषी दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय सन १९८९मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी घोषित केले. तेव्हापासून एक जुलैला शासकीय स्तरावर सर्व कार्यालयात कृषीदिन साजरा होत आहे. तर दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे शेतकऱ्यांचे कैवारी, शेतीवर निस्सीम भक्ती असणारे क्रांतिकारी कृषीसंत वसंतराव नाईक नेहमी म्हणायचे कि, मी मुख्यमंत्र्यांच्या सिंहासनावर देहाने जरी असलो तरीदेखील माझे चित्त मात्र शेतकऱ्यांच्या बांधावर असते. हा वसंतविचार लक्षात घेता शेतकऱ्याप्रति कृतज्ञता व शेतकऱ्याना आत्मबळ देण्यासाठी प्रसिद्ध साहित्यिक, विचारवंत एकनाथराव पवार यांनी कृषी दिन थेट बांधावर साजरा करण्याची अभिनव संकल्पना रूजवली. तेंव्हापासून कृषीदिवस हा थेट बांधावर शेत शिवारातही साजरा करण्यास सुरुवात झाली. कार्यालयात साजरा होणारा कृषीदिवस आज थेट शेत बांधावरही साजरा करण्याची प्रथा रूढ झाली. कृषी दिन शासकीय कार्यालयीन स्तरावर ते थेट शेत बांधावर साजरा करण्याच्या या प्रवासात मात्र पवार हा एक दुर्मिळ संयोग जुळून आल्याचे म्हणता येईल. आज कृषी दिवस हा कार्यालयाबरोबरच थेट शेतबांधापर्यंत सर्वत्र साजरा होतो. इतर राज्यात देखील १ जुलैला कृषी दिन साजरा होतांना दिसून येते.

कृषीप्रधान भारत म्हणून ओळखले जाणाऱ्या देशात कृषीसंस्कृतीचे स्मरण आणि शेतकरी कृतज्ञतेचा प्रतिक म्हणून १ जुलै कृषीदिनाला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. कृषी दिवस हा नैसर्गिकरित्याच पेरणीच्या मुहूर्तावर आलेला एक पावनपर्व आहे. महानायक वसंतराव नाईक यांनी हरितक्रांती व श्वेतक्रांती घडवून आणली. याशिवाय पंचायत राज व रोजगार हमी योजनाचे देखील वसंतराव नाईक हे शिल्पकार मानले जातात. ते पहिले शेतकरी मुख्यमंत्री व शेतकऱ्यांचा राजा म्हणून ओळखले जातात. भूमिहिनांना लाखो एकर जमीन त्यांनी वाटप केली. शेतकऱ्यांच्या जीवनात स्वाभिमान आणि समृद्धी फुलवीण्याचे तसेच कृषीसंस्कृतीला नवसंजीवनी देण्याचे ऐतिहासिक कार्य महानायक वसंतराव नाईक यांनी केले. शिवाय पहिल्यांदाच चार कृषी विद्यापीठाची स्थापना केली. १९७२ सारख्या भिषण दुष्काळातही महानायक वसंतराव नाईक यांच्या कारकिर्दीत कधी शेतकरी आत्महत्या हा शब्द देखील गवसला नव्हता. शेतकऱ्यांवर त्यांचे जिवापाड प्रेम होते. शेती आणि मातीवरील त्यांची निस्सीम भक्ती ही भारतीय कृषीसंस्कृतीच्या इतिहासात एक प्रेरणा म्हणून ओळखली जाते. शेतकरी हा कारखानदार झालाच पाहिजे अन् शेतकऱ्यांचे लेकरं सुद्धा कलेक्टर झाली पाहिजेत. हे महानायक वसंतराव नाईक यांचे स्वप्न होते. थेट बांधावर आधुनिक कृषीतंत्रे व दूरगामी उपाययोजनांची अमलबजावणी याबरोबरच नव्या पिढीत शेती, शेतकऱ्याप्रति जिव्हाळा निर्माण केल्यास नाईकसाहेबांचे स्वप्ने पुर्णत्वास येऊ शकते.



भारतीय कृषीसंस्कृतीला उजाळा देणाऱ्या कृषी दिन या पावन पर्वाचे जनमाणसात अनन्यसाधारण असे महत्त्व असून शासकीय कार्यालय, गाव शहरात अनेक जयंती साजरी केली जाते. त्याचबरोबर थेट बांधावर–शेत शिवारातही मोठ्या प्रमाणात कृषी दिवस साजरा होत असल्याने या पर्वाला एक विशेष महत्व प्राप्त झाले आहे. शेती व शेतकऱ्यांवरील निर्व्याज प्रेम आणि कृतज्ञता म्हणून थेट शेतकऱ्यांच्या बांधावर मोहीमेचे प्रवर्तक एकनाथराव पवार यांनी सन २०११पासून कृषी दिन थेट बांधावर साजरा करण्याची अभिनव मोहीम सर्वप्रथम सुरू केली. आज ही संकल्पना एक प्रथा म्हणून नावारूपाला आली.

या दिवशी कृषीसंस्कृतीचे संस्मरण करून कृषीसंस्कृतीच्या समृद्धीसाठी संकल्प केल्या जाते. हा पर्व थेट बांधावर, शेत शिवारातही साजरा होत असून यात शेतकरी सन्मान, समुपदेशन, फळझाडांची लागवड व शेतकऱ्यांचे भाग्यविधाते महानायक वसंतराव नाईकांना आदरांजली अशा विविध स्वरूपात साजरा केला जातो. थेट शेत बांधावर शेतकऱ्याप्रति कृतज्ञता व्यक्त केली जावी, शेतकऱ्यांना आत्महत्यापासून परावृत्त करून आत्मबळ मिळावे. आधुनिक शेती तंत्राचा जागर व्हावा, शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक व्हावा शेतकऱ्यांप्रति कृतज्ञता व्यक्त केली जावी या उद्देशाने प्रसिद्ध विचारवंत एकनाथराव पवार यांनी कृषी दिवस थेट बांधावर, शेत शिवारात साजरा करण्याची सर्वप्रथम मोहीम सुरू केली होती. या मोहीमेची दखल पुढे सामाजिक स्तरासोबतच इंडिया बुक ऑफ रेकॉर्डने दखल घेतली. शिवाय पुढे सन २०१९मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या काळात शासनस्तरावरही दखल घेण्यात आली. त्यामुळे कृषी दिन थेट शेत बांधावरही साजरा होत असल्याने या दिवसाला अनन्यसाधारण असे महत्त्व प्राप्त झाले. कार्यालयात साजरा होणारा कृषी दिन हा आता थेट बांधावरही साजरा केला जात असून कृषीदिनानिमीत्त थेट बांधावर कृषी संजीवनी सप्ताह, वसंतराव नाईक हरित महाराष्ट्र अभियान व शेतकरी कृतज्ञता सप्ताह सारखे स्तुत्य उपक्रम दरवर्षी राबविले जातात.

!! महाराष्ट्र कृषी दिनानिमित्त समस्त शेतकरी बांधवांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

*********

– संकलन व सुलेखन –
श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजी.
श्रीगुरूदेव मंदिराजवळ, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सप– ९४२३७१४८८३.

# अजूनही न्यायाच्या प्रतीक्षेत! बॅकवॉटर लेव्हल्सचा मुद्दा काय आहे?



नर्मदा खोऱ्यात मेधा पाटकर यांनी सुरू केलेले अनिश्चितकालीन उपोषण नुकतेच संपले असले तरी, शासनाने दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी प्रत्यक्षात किती आणि कशी होते याची परीक्षा अद्याप पुढे आहेच!

नर्मदा बचाओ आंदोलनाच्या ३९ वर्षांच्या अथक प्रयत्नांनीच सरदार सरोवर प्रकल्पातील ५० हजार कुटुंबांना पुनर्वसन मिळाले. तरीही अद्याप काही हजार कुटुंबांचे पुनर्वसन बाकी आहे. २०१९ पासून बुडितात आलेली पाचेकशे कुटुंबे पुनर्वसन न मिळाल्यामुळे मागील पाच वर्षे दहा बाय बाराच्या शेडमध्ये राहत आहेत. अनेक प्रकल्पग्रस्तांना जमिनीच्या बदल्यात सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार देय ६० लाख रुपयांची रक्कम अद्याप मिळालेली नाही तर अनेकांना पाच लाख ८० हजार रुपयांचे गृहनिर्माण अनुदान! सर्वोच्च न्यायालयाच्या २००० ते २०१७ पर्यंतच्या विविध आदेशांमध्ये आणि नर्मदा ट्रायब्युनल अवॉर्डमध्येही पुनर्वसनाचे सर्व काम बुडिताच्या आधी सहा महिने पूर्ण व्हावे असे म्हटले आहे. मात्र त्यांच्या पुनर्वसनासाठी शासनानेच उपलब्ध केलेली रक्कम प्रकल्पग्रस्तांच्या खात्यात टाकण्याचे काम होत नाही. ही सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची पायमल्ली आहे. सर्वात संतापजनक स्थिती आहे ती १५० गावांमधल्या १५,९४६ म्हणजे जवळजवळ १६ हजार कुटुंबांची. त्यांना धरणाच्या सुरुवातीच्या काळात बुडीत क्षेत्रात मानले गेले, त्या वेळी भूसंपादनाची भरपाई आणि बहुतेकांना घरप्लॉटसही मिळाले. २००८ साली त्यांना सांगण्यात आले की ते बुडीतक्षेत्राच्या बाहेर आहेत. मात्र यापैकी शंभराहून अधिक गावांमधील हजारो घरांमध्ये मागच्या वर्षी, २०२३ च्या पावसाळ्यात अचानक पाणी भरले. धरणाची उंची १३८.६ मीटर असताना पाणी १४२.५ मीटर आणि काही ठिकाणी तर १६० मीटर इतक्या उंचीपर्यंत गेले. अडीच तासांमध्ये घरे जलमय झाली. रहिवाशांना नेसत्या वस्त्रानिशी तिथून बाहेर पडावे लागले. घरे, धान्यधुन्य, चारा सगळ्याच्या नुकसानीची कुठे पाच, कुठे सात तर क्वचित कुठे ५० हजार अशी रक्कम देण्यात आली. मात्र मध्य प्रदेश सरकार हे धरणाचे बुडीत असल्याचे नाकारून हा अतिवृष्टीमुळे आलेला पूर असल्याचे सांगून धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाची तसेच नुकसान भरपाई देण्याची टाळाटाळ करत आहे. ज्यांच्या बेजबाबदार जलप्रवाहनियमनामुळे हे संकट ओढवले ते केंद्रीय अधिकरणही गप्पचआहे! महाराष्ट्रातील पुनर्वसनाची स्थिती तुलनेने बरी असली तरी आता, २०२३ मध्ये आलेल्या बुडितात आलेले महाराष्ट्रातले १५३ सर्व्हे नंबर असे आहेत की ज्यांचे भूसंपादनही झालेले नाही. २०२३ मधील अतिरिक्त बुडिताचा फटका गुजरातमध्येही बसला. १८ लाख क्युसेक्सने आलेल्या पाण्यामुळे गुजरातमधील भरूच, बडोदा, नर्मदा या तीन जिल्ह्यांमधली हजारो घरे, दुकाने, शेते, पिके, मंदिरे बुडाली. हे सर्व मुद्दे 'आंदोलना'ने सातत्याने उपस्थित केले होते. २०२३ मध्ये आलेल्या असाधारण बुडितात आलेल्या प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळावा यासाठी वर्षभर पाठपुरावा केला. तरीही प्रशासन काहीबाही केल्यासारखे दाखवत होते किंवा काहीही करत नव्हते अशी स्थिती! मागील वर्षी नव्याने बुडितात आलेल्या जमिनीचे, कुटुंबांचे पुनर्वसन वगळता बाकी सर्व मुद्द्यांवर निर्णय झालेलेच होते. मात्र त्यांची अंमलबजावणी होत नव्हती. मध्य प्रदेशातील या १६ हजार कुटुंबांना नुकसानभरपाई देण्याबाबतचा निर्णय हा 'धोरणात्मक निर्णय' असल्याचे सांगत प्रशासन हात वर करत होते, तर सत्ताधीशांना तर या प्रश्नाशी काही देणे घेणेच नाही अशी परिस्थिती आहे! नर्मदा कंट्रोल ॲथॉरिटी , नर्मदा व्हॅली डेव्हलपमेंट ॲथॉरिटी , जलशक्ती मंत्रालय, मुख्यमंत्री या सर्वांशी या सगळ्या मुद्द्यांवर दीर्घकाळ चर्चा होऊनही या प्रश्नाची तड लागत नव्हती. या सर्व मुद्द्यांवर ६ जूनला एनव्हीडीएचे आयुक्त दीपक सिंग यांच्याशी तपशीलवार चर्चा झाली, पणे काहीच घडले नाही. अखेर मेधाताईंनी उपोषणाचा निर्णय घेतला. चिखलदा या नर्मदेकाठच्या उद्ध्वस्त गावातील, खेडा या अत्यंत पडझड झालेल्या वस्तीत मेधाताई उपोषणाला बसल्या होत्या. ठिकठिकाणच्या गावांमधले लोक त्यांच्या समर्थनार्थ येत होते. काही जण तर साखळी उपोषणालाही बसले. सुरुवातीचे एक–दोन दिवस एसडीएम आणि तत्सम स्तरावरचे काही अधिकारी येऊन उपोषण सोडण्याची विनंती करून गेले, पण त्यात काही अर्थ नव्हता. गरज होती कायदा, धोरण, आदेश यांच्या आधारे झालेल्या निर्णयांच्या ताबडतोबीच्या अंमलबजावणीची आणि त्या १६ हजार कुटुंबांच्या पुनर्वसनाची. उपोषणाच्या चार दिवसांनंतर मेधाताईंना शारीरिक त्रास सुरू झाला आणि क्रमाक्रमाने त्यांची तब्येत ढासळत गेली. उपोषणाच्या पाचव्या दिवशी आम्ही नर्मदा बचाओ आंदोलनाच्या कार्यकर्त्यांसह धार जिल्हाधिकारी प्रियांक मिश्रा यांना त्यांच्या कार्यालयात भेटलो. 'मागील वर्षभरात आमच्या सर्व यंत्रणेला दोन मोठ्या निवडणुकांना सामोरे जावे लागले. आमचे कर्मचारी त्यामध्ये गुंतलेले राहिले. आता आम्ही या सर्व प्रलंबित कामाची पूर्तता करू.' असेच ते म्हणत राहिले. दरम्यान देश आणि जगभरातून समर्थनाची पत्रे, निवेदने येत होती. नर्मदा बचाओ आंदोलनाची न्यायालयीन लढाई लढणारे ज्येष्ठ विधिज्ञ संजय पारेख २१ जून रोजी इंदोरमध्ये आले. त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली. २२ तारखेला दुपारी धारचे जिल्हाधिकारी प्रियांक मिश्रा यांनी आंदोलन स्थळी प्रत्यक्ष आणि आयुक्त दीपक सिंग यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थित राहून मेधाताई आणि आंदोलकांशी चर्चा केली. पुनर्वसनाच्या कार्यातील त्रुटींची पूर्तता लवकरात लवकर करू आणि त्यातल्या धोरणात्मक बाबींबाबत केंद्र सरकारकडे तात्काळ शिफारस करू असे आश्वासन देऊन त्यांनी मेघाताईंना उपोषण मागे घेण्याची विनंती केली. 'ही अंमलबजावणी तात्काळ न झाल्यास आणि बुडीत आल्यास त्याची जबाबदारी प्रशासनाची असेल आणि बुडीत क्षेत्रात आम्ही जल सत्याग्रह करू' असा इशारा मेधाताईंनी संबंधित अधिकाऱ्यांना दिला. या आश्वासनाची पूर्तता न झाल्यास आंदोलनाच्या वतीने न्यायालयात आपण उभे राहू असे वरिष्ठ अभियुक्त संजय पारेख यांनीही स्पष्टपणे जाहीर केले. कमिशनर आणि कलेक्टर यांच्या विनंतीला मान देत आणि सर्व आंदोलक, समर्थक यांच्या साक्षीने मेधाताईंनी आठव्या दिवशी उपोषण सोडले. त्यांना ताबडतोब इस्पितळात हलवून अतिदक्षता विभागात ठेवण्यात आले.

माँ नर्मदा को बहने दो सरदार सरोवर धरणाबाबत सरकारने केलेले सर्व दावे खोटे ठरले आहेत. ४० वर्षांनंतरही पुनर्वसन पूर्ण झालेले नाही. कच्छ – सौराष्ट्र या दुष्काळी भागाच्या नावावर बांधलेल्या धरणाचे पाणी प्रत्यक्षात जाते आहे कार्पोरेट्सकडे. वेगाने जाणारे पाणी अडवल्यामुळे समुद्र आत येण्याचे संकट आले आहे. वर्षभर भरभरून वाहणारी नर्मदा आता ठिकठिकाणी कोरडी पडू लागली आहे. नर्मदा बचाओ आंदोलनाने ३५–४० वर्षांपूर्वी अभ्यासांसह मांडलेल्या आणि आज प्रत्यक्षात आलेल्या पर्यावरणीय, सामाजिक हानीचा तर कुठे हिशोबच नाही! नर्मदा बचाओ आंदोलनाचा हा सुमारे चार दशकांचा, म्हणजे दोन पिढ्यांचा तीव्र संघर्ष पाहताना दरवेळी मनात येते की संवैधानिक मार्गाने चालणाऱ्या जनआंदोलनांशी सरकारे अत्यंत संवेदनशून्यतेने वागत असतील तर जनतेला आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची दाद मागण्यासाठी कुठले मार्ग उपलब्ध आहेत? बॅकवॉटर लेव्हल्सचा मुद्दा काय आहे? धरणाच्या भिंतीमुळे अडलेला जलप्रवाह उलट्या दिशेने मागे फिरतो आणि जलस्तर उंचावतो, त्याला बॅकवॉटर असे म्हणतात. सेंट्रल वॉटर कमिशनने १९८४ मध्ये प्रत्यक्ष स्थळपाहणी करून सरदार सरोवराच्या बॅकवॉटर लेवल्स निश्चित केल्या होत्या. त्यानुसार ही १५,९४६ कुटुंबे बुडितात येत होती.२००७ मध्ये नर्मदा कंट्रोल ॲथॉरिटी ने आणखी एक समिती बनवली. या समितीने प्रत्यक्ष सर्व्हे न करता नव्या गणिती सूत्राने बॅक वॉटर लेव्हल्स् बदलल्या. अनेक गावांत ती मूळच्या पूररेषेच्या तीन– चार मीटरपर्यंत खाली दर्शवली. या नव्या पूररेषेमुळे आधी बुडितात मानली गेलेली ही १५,९४६ कुटुंबे बुडिताबाहेर दाखवली गेली, त्या आधारे २०१६ मध्ये सर्व धरणग्रस्तांचे पुनर्वसन पूर्ण झाल्याचे जाहीर करण्यात आले आणि २०१७ मध्ये धरणाचे उद्घाटन करण्यात आले. जलाशयाच्या पाण्याचे नियमन करण्याची जबाबदारी नर्मदा कंट्रोल ॲथॉरिटीवर असते. त्यामध्ये वरच्या धरणांमुळे येणाऱ्या पाण्याचे नियोजन आणि नियमन आणि पुराच्या वेळी धरणाचे दरवाजे उघडून अतिरिक्त पाणी चढणार नाही असे पाहणे हे दोन्ही येते. प्रत्यक्षात २०२३ साली वरच्या ओंकारेश्वर धरणाचा संपूर्ण जलाशय, आदिगुरू शंकराचार्यांचा पुतळा बसवण्याच्या कार्यक्रमासाठी भरून ठेवण्यात आला होता. १५–१६ सप्टेंबरला ओंकारेश्वरचे पाणी सोडण्यात आले जे सरदार सरोवराच्या जलाशयात कुठल्याही पूर्वसूचनेशिवाय भरले. त्यात पंतप्रधानांचा वाढदिवस १७ सप्टेंबरला असल्यामुळे सरदार सरोवराचेही दरवाजे बंद करून तो संपूर्ण जलाशयही भरला गेला. आणि संततधार पाऊसही पडत होता. या सगळ्याचा एकत्रित परिणाम म्हणून मोठे बुडीत आले ज्याने या, बुडितातून वगळलेल्या शंभरहून अधिक गावांमध्ये पाणी भरले व या गावा – घरांना मोठा फटका बसला, घरे उद्ध्वस्त झाली, काही मृत्यूही झाले. तसेच, हे समारंभ झाल्यानंतर सरदार सरोवरातून १८ लाख क्युसेक्स एवढे पाणी सोडल्यामुळे सरदार सरोवराच्या खालच्या भरूच, बडोदा, नर्मदा जिल्ह्यांमधली घरे, दुकाने, शेती, तीर्थक्षेत्रे इत्यादी जलमय झाली. मात्र ही स्थिती असाधारण नव्हती. यापूर्वीही डूब क्षेत्रामध्ये पाणी भरलेले आहे. म्हणूनच वस्तुनिष्ठ पूररेषा निश्चित करून त्याखाली येणाऱ्या सर्वांचे संपूर्ण पुनर्वसन करावे आणि तोपर्यंत जलाशय भरू नये अशी आंदोलनाची मागणी आहे. या १५,९४६ कुटुंबांपैकी अनेकांना पूर्वीच भूसंपादनाचा मुआवजा आणि भूखंड मिळालेला असला तरी त्यापैकी हजारोंना अद्याप मिळायचा आहे. त्याचबरोबर घरबांधणीसाठी मिळणारे ५.८० लाखांचे अनुदान व धरणग्रस्तांना मिळणारे अन्य लाभ मिळणे आवश्यक आहे. सत्याग्रहाची ही एक प्रमुख मागणी होती. नर्मदा अवॉर्डनुसार तात्कालिक किंवा कायमस्वरूपी बुडीत येण्यापूर्वी सहा महिने आधी संपूर्ण पुनर्वसन होणे आवश्यक आहे. म्हणूनच हे पुनर्वसन होईपर्यंत जलाशय भरू नये म्हणजेच धरणाच्या भिंतीच्या १२२ मीटरच्या उंचीपर्यंतच पाणी पातळी ठेवावी व त्यावरील १७ मीटरचे दरवाजे उघडे ठेवावेत असा 'आंदोलना'चा आग्रह आहे, ज्याला नर्मदा ट्रिब्यूनल अवॉर्ड तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या विविध आदेशांचा आधार आहे.

# विद्यार्थ्यांनी संस्कार, संकल्प आणि सिद्धीकडे यशस्वी वाटचाल करावी-माधवराव पाटील (टाकळीकर)

लातूर / प्रतिनिधी :- महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेची सुरुवात लोकशाहीचे जनक जगतज्योती महात्मा बसवेश्वरांच्या विचाराने झाली असून श्री देशीकेंद्र महाराज यांच्या पावनस्मृतीने ही संस्था उज्वल यश संपादन करीत आहे. त्यांच्या विचाराचा वारसा घेऊन विद्यार्थ्यांनी संस्कार, संकल्प आणि सिद्धीकडे यशस्वी वाटचाल करावी असे प्रतिपादन श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव माधवराव पाटील (टाकळीकर) यांनी केले.

महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचालित महात्मा बसवेश्वर विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थी-शिक्षक-पालक मेळावा व्होकेशनल सभागृहात संपन्न झाला यावेळी ते अध्यक्षीय समारोप करताना बोलत होते.

या कार्यक्रमाची सुरुवात महात्मा बसवेश्वर प्रतिमा पूजन आणि दीप प्रज्वलन करून झाली.

यावेळी प्रा. विश्वनाथ स्वामी, गोविंद पवार आणि विद्यार्थिनींनी स्वागत गीत सादर केले.

पुढे बोलताना माधवराव पाटील टाकळीकर म्हणाले की, आमची शिक्षण संस्था व महाविद्यालय विद्यार्थी सेवा हीच ईश्वर सेवा आहे या विचाराने कार्य करते. आमच्या महाविद्यालयात प्रथम आणि द्वितीय येणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणामध्ये विशेष सवलत दिली जाईल. तसेच विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवण्यासाठी त्यांना पुरस्कारही प्रदान केले जाईल. आम्ही विद्यार्थ्यांसाठी २४ तास ग्रंथालय उपलब्ध करून देण्याचाही प्रयत्न करीत आहोत. विद्यापीठामध्ये गोल्ड मेडल प्राप्त करणाऱ्या प्रथम आणि द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना रोख रक्कमेचे पारितोषकही वैयक्तिकरित्या देण्याची घोषणाही याप्रसंगी त्यांनी केली. विद्यार्थ्यांची दिनचर्या आईपासून सुरुवात होते त्यामुळे महाविद्यालयात प्राचार्य, उपप्राचार्य पर्यवेक्षक आणि शिक्षकांच्या जबाबदारीसोबतच विद्यार्थी आणि पालकांचीही आहे. आमच्या संस्थेअंतर्गत चालणाऱ्या महाविद्यालयात शिक्षण घेत असतील तर आमच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांच्या एकूण प्रवेश शुल्कामध्ये २५ टक्के सवलत ही देण्याची घोषणाही केली.





या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य प्रा. संजय पवार करताना म्हणाले की, महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी ग्रंथालयापासून ते विविध महत्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या नीट व सीईटी सारख्या परीक्षांसाठी पूर्ण तयारी विद्यार्थ्यांकडून करून घेतली जाते.

यावेळी प्रा. वनिता पाटील म्हणाल्या की, दर रविवारी एम सी क्यू पॅटर्ननुसार परीक्षा घेतली जाते. वर्षभरात विद्यार्थ्यांच्या २० सराव परीक्षा घेतल्या जातात. ग्रंथालयातून पुस्तके विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिली जातात. विद्यार्थ्यांच्या शंका निरसनासाठी डीएसपी क्लासची सुविधाही उपलब्ध करून दिले जाते.

पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे म्हणाले की, सध्या स्पर्धे चं युग आहे. या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांना यशस्वी व्हायचं असेल तर विद्यार्थी संस्कृतमधील श्लोकाप्रमाणे सदैव तत्पर जागरूक आणि मेहनती असायला पाहिजे.

यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, विद्यार्थी हा गुणवंता सोबतच गुणवान बनले पाहिजे. विद्यार्थी आपल्या आई-वडिलांना आदर्श मानून त्यांच्या ऋणात सदैव राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

यावेळी कार्यकारी संचालक प्रदीपकुमार दिंडीगावे यांनीही शुभेच्छापर मनोगतामध्ये म्हणाले की, महाविद्यालय आणि पालक शिक्षक विद्यार्थी व अभ्यासक्रम असा समुचित शिक्षणाचा वलय असतो. शिक्षकांची जेवढी जबाबदारी आहे तेवढीच जबाबदारी पालकांची पण असते म्हणून पालकांनीही आपल्या पाल्यांकडे विशेष लक्ष दिलं पाहिजे. विद्यार्थ्यांच्या एकूण दैनंदिन कार्याबद्दलची तंतोतंत माहिती पालकांनी ठेवली पाहिजे असे ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. घनश्याम ताडेवार यांनी केले तर आभार प्रा. एस. एस. पाटील यांनी मानले.

या मेळाव्याला अकरावी विज्ञान शाखेतील नवोदित प्रवेशित झालेले विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## दीक्षाभूमीतल्या अंडरग्राऊंड पार्किंगचा वाद पेटला

नागपूर : नागपूरमध्ये दीक्षाभूमीतील अंडरग्राऊंड पार्किंगला नागरिकांनी विरोध केला आहे. यावेळी संतप्त आंदोलकांनी बांधकामाचं साहित्य फेकून देत निषेध नोंदवला. तसेच बांधकाम साहित्य पेटवून देण्यात आले. दीक्षाभूमीमध्ये विकास प्रकल्पाचे काम सुरू आहे. यात मात्र अंडरग्राऊंड पार्किंगला विरोध होत आहे. या अंडरग्राऊंड पार्किंगला आंबेडकरी समाजबांधवांनी कडाडून विरोध केला आहे. सोमवारी मोठ्या संख्येने समाजबांधव दीक्षाभूमीवर एकत्र आले आणि त्यांनी पार्किंगचे काम थांबवले. आंदोलकांनी बांधकाम साहित्य आणि बोर्डाची तोडफोड केली आहे. शिवाय बांधकाम साहित्य पेटवून दिले आहे. याप्रकरणी प्रतिक्रिया देताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, दीक्षाभूमी हा आस्थेचा विषय आहे. त्यांची भावना लक्षात घेऊन विकास व्हावा. जनभावना लक्षात न घेता सरकारने आपसात भांडण लावून देऊ नये. दरम्यान, आमदार जितेंद्र आव्हाड यांनी या प्रकरणी प्रतिक्रिया देताना सांगितले की, बौद्ध अनुयायी यांना विश्वासात न घेता श्रद्धास्थानाला धक्का लावण्याचे काम सुरू आहे.

## दीक्षाभूमी येथील अंडरग्राऊंड पार्किंगचे काम तात्काळ थांबवावे माजी मंत्री डॉ. नितीन राऊत यांची सभागृहात मागणी

पावणेचार एकरची जागा दीक्षाभूमीला द्या
दीक्षाभूमी परिसरात अंडरग्राउंड पार्किंग झाल्यास दीक्षाभूमीच्या मूळ ढाचाला तसेच स्तूपाला धोका होऊ शकतो. त्यामुळे याठिकाणी पार्किंग करू नका. पार्किंगच हवी असले तर या परिसरात पुढे पावणेचार एकरची जागा आहे. ती जागा दीक्षाभूमीला देण्याची मागणी डॉ. राऊत यांनी केली आहे. या जागेवर पार्किंगची व्यवस्था केली जावू शकते.

डॉ. राऊत यांनी आक्रमक पणे विषय मांडल्याने पार्किंगच्या कामाला राज्य सरकारची स्थगिती
राज्याचे माजी मंत्री डॉ. नितीन राऊत यांनी विधानसभेत दीक्षाभूमी येथील अंडरग्राउंड पार्किंगच्या मुद्दा लावून धरला होता. दरम्यान, याची दखल घेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळात तात्काळ येऊन दिक्षाभूमी येथील पार्किंगच्या कामाला स्थगिती देण्यात येत आहे, अशी घोषणा केली.

मुंबई / नागपूर :- नागपूर येथील पवित्र दीक्षाभूमी येथे अंडरग्राऊंड पार्किंग केली जात आहे. त्याला आंबेडकरी जनतेने विरोध केला असून त्या ठिकाणी मोर्चा काढला आहे. येथील कामामुळे दीक्षाभूमीच्या मूळ ढाचाला तसेच स्तूपाला धोका होऊ शकतो. त्यामुळे हे काम थांबविण्याची मागणी आज काँग्रेसचे जेष्ठ नेते आणि राज्याचे माजी मंत्री डॉ. नितीन राऊत यांनी सभागृहात केली. धम्मचक्र प्रवर्तन दिनी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीला, महापरिनिर्वाण दिनी आणि बुद्ध पौर्णिमेला लाखोंच्या संख्येने जगभरातून लोक दीक्षाभूमीवर येतात. या परिसरात १० लाखांच्यावर लोक येत असतात. याठिकाणी कुठलीही पार्किंगची मागणी नसतांना स्मारक समितीने येथे अंडरग्राऊंड पार्किंगचा घाट घातला. याविरोधात जनता उतरली आहे. राज्य सरकार आणि समितीने लोकांच्या भावनेशी खेळू नये. अश्या शब्दात डॉ. राऊत यांनी लोक भावनेचा आदर करुन येथील अंडरग्राउंड पार्किंगचे काम तात्काळ थांबविण्याकरिता विधानसभेत हा मुद्दा लावून धरला. दिक्षाभूमी येथील बांधकामाचे आणि घडलेल्या घटनेकडे सरकारचं लक्ष वेधत डॉ. राऊत पुढे म्हणालेत, हा लोकांच्या भावनेचा विषय आहे. हे काम सुरू करण्यापूर्वी लोकांना विश्वासात घ्यायला हवं होतं. त्यांच्याकडून सूचना घ्यायला हव्या होत्या. त्यानंतर बांधकाम सुरु करायला पाहिजे अश्या शब्दात डॉ. राऊत यांनी स्मारक समिती आणि सरकारचे कान टोचले.

---

## पावसाळ्यात तुम्हालाही यूटीआयचा त्रास जाणवतोय? जाणून घ्या त्याची लक्षणे आणि योग्य उपचार पद्धती




पावसाळ्यात अनेकांना यूटीआयचा त्रास जाणवतो, कारण पावसात वातावरण एकदम दमट असते; ज्यात सूक्ष्मजंतू, जीवाणू, बुरशी वेगाने वाढू लागतात. याशिवाय साचलेल्या पाण्यात डास, माश्या आणि इतर रोगवाहक जीवाणूंना प्रजननासाठी जागा तयार होतात. या सर्व दूषित वातावरणामुळे अनेकांना योनी मार्गातील जंतू संसर्गाचा त्रास जाणवतो. यावर उपचार करण्यासाठी आपण अनेक गोळ्या, औषधे घेतो. पण, आजार नेमका काय आहे, याची लक्षणे काय? तसेच उपचार कशा पद्धतीने केले पाहिजेत? यावर मुंबईतील वांद्रे येथील होली फॅमिली हॉस्पिटलमधील इंटर्नल मेडिसिन, जनरल आणि क्रिटिकल केअर फिजिशियन डॉ. अनुपमा सरदाना यांनी इंडियन एक्स्प्रेसला दिलेल्या माहितीवरून जाणून घेऊ यूटीआय म्हणजे काय? पावसाळ्यात बॅक्टेरिया मूत्र मार्गात प्रवेश करतात आणि वाढू लागतात, ज्यामुळे यूटीआयचा संसर्ग होतो. बॅक्टेरिया मूत्रमार्गाच्या उघड्या जागेतून प्रवेश करतात. यानंतर मूत्रमार्गाच्या आतील वरच्या दिशेने जातात आणि संक्रमण करतात, काहीवेळा गंभीर प्रकरणांमध्ये संसर्ग मूत्रपिंडापर्यंत जाऊ शकतो आणि उपचार न केल्यास त्याचे नुकसान होऊ शकते. पावसाळ्यात यूटीआयचा संसर्ग का वाढतो? पावसाळ्यात एकाच वेळी उष्ण आणि दमट वातावरण असते. काही लोकांना अनेकदा जास्त घाम येतो, असे असूनही ते कमी पाणी पितात. या दोन्ही गोष्टी काहीवेळा निर्जलीकरणास कारणीभूत ठरतात. यामुळे लघवीचे प्रमाण कमी होते, ज्यामुळे बॅक्टेरिया मूत्रमार्गात जास्त काळ राहतात आणि संसर्गाचा धोका वाढतो. या व्यतिरिक्त पाऊस आणि घाम यामुळे अंगावरील कपडे ओलसर राहतात. अशावेळी जननेंद्रियाच्या आसपास बॅक्टेरिया वाढू लागतात, ज्यामुळे यूटीआयचा धोका वाढतो. पावसाळ्यात स्वच्छतेचा अभाव आणि दूषित पाण्याचे प्रमाण अधिक असते. जर योग्य स्वच्छता राखली नाही तर दूषित पाण्यामुळे मूत्रमार्गात रोगजंतूंचा प्रसार होतो. तसेच विविध आजारांमुळे पावसाळ्यात अनेकदा डॉक्टरांचे उपचार घ्यावे लागतात. या काळात रुग्णालयांमध्येही यूटीआय संक्रमित रुग्णांची संख्या अधिक असते.

पुरुषांपेक्षा स्त्रियांना जास्त त्रास का होतो? यामागचे कारण म्हणजे स्त्रियांचे मूत्रमार्ग गुदद्वाराच्या उघडण्याच्या अगदी जवळ असते आणि त्यामुळे योग्य स्वच्छता न पाळल्यास जंतू आणि इतर हानिकारक सूक्ष्मजीवांना मूत्रमार्गावर परिणाम करणे सोपे होते. दुसरे म्हणजे, स्त्रियांमध्ये मूत्रमार्ग पुरुषांपेक्षा लहान असल्याने संसर्गाचे प्रमाण वाढते.यूटीआयची लक्षणे काय आहेत? लघवी करताना वेदना आणि जळजळ, वारंवार लघवी झाल्यासारखे वाटणे, गडद किंवा दुर्गंधीयुक्त लघवी होणे, थकवा, ओटीपोटात तीव्र वेदना, ताप, मळमळ आणि उलट्या. यूटीआयवर उपचार कसे करावे?

डॉक्टरांच्या सल्ल्यानुसारच यूटीआयवर उपचार करा, कारण तुमचे डॉक्टर लघवीतील इन्फेक्शनच्या आधारे तुम्हाला औषधं, गोळ्यांची शिफारस करतील. डॉक्टरांच्या सल्ल्याचे पालन करा आणि औषध, गोळ्यांचा कोर्स पूर्ण घ्या. तुम्हाला बरे वाटले तरी औषध, गोळ्या घेणे मध्येच बंद करू नका. कारण औषध, गोळ्यांचा कोर्स पूर्ण न केल्यास त्रास पुन्हा वाढू शकतो. अशा परिस्थितीत उपचार करणे अधिक आव्हानात्मक होऊ शकते. यूटीआय संक्रमण कसे टाळायचे? स्वत:ला हायड्रेटेड ठेवा, जेणेकरून तुमचे शरीर जीवाणू, विषाणूंचा चांगल्या प्रकारे प्रतिकार करू शकेल. स्वच्छता राखा, स्वच्छ पाणी प्या, कोरडे स्वच्छ कपडे परिधान करा. तसेच पावसामुळे ओले झालेले कपडे ताबडतोब बदला, जेणे करून तुम्हाला यूटीआयचा त्रास जाणवणार नाही.

## पावसाळ्यात अपचनाचा त्रास अधिक का होतो?



उन्हाळ्यामधील शरीराच्या आरोग्याची स्थिती बरी होती, असे म्हणावे एवढी वाईट देह-स्थिती पावसाळ्यामध्ये, त्यातही आरंभीच्या प्रावृट् ऋतूमध्ये होते. त्यामधील सर्वात महत्त्वाचा शरीरबदल म्हणजे 'अग्निमांद्य'. अग्नी म्हणजे शरीरामध्ये पेटणारी भूक वा पचनशक्ती असा मर्यादित अर्थ नसून शरीराची अन्नसेवन करण्याची इच्छा (भूक), अन्न पचवण्यास साहाय्यक विविध प्रक्रिया, त्या अन्नाचे ऊर्जेमध्ये रुपांतर करण्याच्या व त्याज्य घटक उत्सर्जित करण्याच्या प्रक्रियांना मिळून जी यंत्रणा आहे ती म्हणजे 'अग्नी'.

आयुर्वेदाला अपेक्षित अग्नी अधिक नेमकेपणे सांगायचे तर सेवन केलेल्या अन्नाच्या प्रत्येक कणाकणाचे पचन, त्यापासून ऊर्जेची वा शरीरपेशींची निर्मिती व तयार होणार्या त्याज्य घटकांचे उत्सर्जन या तीनही पातळ्यांवर ज्या अनेक जैव- रासायनिक क्रिया- प्रक्रिया घडून येतात, त्या सर्वांना मिळून आयुर्वेदाला अपेक्षित असलेली 'अग्नी' ही संकल्पना आहे. अग्नीची ही तीनही कार्ये पावसाळ्यामध्ये विकृत होतात, रुग्णांनाही तसाच अनुभव येतो.

भूक मंदावते उन्हाळ्यामध्ये अग्नी मंद असतोच, मात्र प्रावृट् ऋतूमध्ये (आरंभीच्या पावसाळ्यामध्ये) तो अधिकच मंद होतो. त्यामुळे उन्हाळ्यापेक्षाही पावसाळ्यातल्या या दिवसांमध्ये भूक मंदावते. जेवणावरची वासना कमी होऊन अक्षरशः जेवणाची वेळ झाली म्हणून जेवायचे अशी स्थिती होते. अन्नामध्ये रुची राहत नाही. बळेच जेवले तरी अग्निमांद्यामुळे अन्नाचे धड पचनही होत नाही. त्यामुळे या दिवसांमध्ये पचनाच्या विविध तक्रारींनी लोक बेजार होतात. जसे की, अन्नसेवन न करताही पोट भरलेले वाटणे, न जेवताही पोट भरल्याचे ढेकर, अन्नसेवन केले की अपचनाचे ढेकर, ढेकर आले की त्यासह आंबट-कडू पित्तही वर येणे, छातीत-पोटामध्ये जळजळ, थोडे खाल्ले तरी पोट डब्ब होणे, पोटामध्ये वारंवार गुबारा धरणे, तो गुबारा अधोमार्गाने वायू सरला तर बरं वाटेल असं वाटत असतानाच दुर्गंधीयुक्त वायू सुटणे, असे त्रास होतात.

मलावरोध किंवा आव पडणे कधी मलावरोधाचा त्रास तर कधी पातळ मलप्रवृत्तीचा. मलासह फेस आणि आव पडण्याची तक्रार तर अनेकांना या दिवसांमध्ये त्रस्त करते. तर दुसरीकडे अनेक जण मलावरोधामुळे त्रासलेले असतात. मल कडक झाल्यामुळे मलविसर्जन करताना कुंथावे लागल्यामुळे रक्तस्राव होण्याची तक्रारही अनेकांना त्रस्त करते. त्यात पुन्हा पावसाच्या आरंभीच्या दिवसांमध्ये हलका आहार घेणे अपेक्षित असतानाही लोक पावसाळी उत्साहामध्ये तिखट, मसालेदार, तेलकट-तूपकट, पचायला जड असा आहार घेतात. तो काहींना पचत नाही आणि अग्निमांद्य अधिकच गंभीर होते. अग्नी मंद झाल्याने सेवन केलेल्या अन्नाचे शरीरकोषांना सात्म्य होईल अशा सूक्ष्म रेणूंमध्ये रुपांतर होत नाही आणि शरीरकोषांना त्या अन्नरेणूंपासून अपेक्षित पोषण मिळत नाही. असे पोषण न मिळालेले शरीरकोष दुर्बल होतात. असे दुर्बल झालेले शरीरकोष व त्या शरीरकोषांपासून तयार झालेले अवयव दुर्बल होतात आणि मग त्या-त्या अंगांचे आजार बळावतात. एकुणात, हे सारे त्या अग्निमांद्यामुळेच होते.

---

# वर्षाऋतूमधील आहार

पावसाळ्यामध्ये पाणी साचल्यामुळे डेंग्यू, मलेरिया, लेप्टोस्पिरोसिस, पोटाचे विकार इत्यादी आजार होऊ शकतात. म्हणूनच पावसाळ्यात आहारावर विशेष लक्ष देणे आवश्यक असते. जाणून घेऊया पावसाळ्यात आरोग्याची काळजी कशी घ्यावी पाणी पावसाळ्यात पाणी उकळून प्यावे. कारण, नदी, नाले विहिरी, तळी यांच्यात येणारे पाणी बऱ्याच घाणीतून प्रवास करुन येत असते. पण बऱ्याच जणांना उकळलेल्या पाण्याची चव आवडत नाही. आजकाल सर्वांच्या घरी फिल्टर किंवा आर ओ चे मशीन असते. परंतु ज्यांना ते शक्य नाही त्यांनी पावसाळ्याच्या वेळी नगरपलिकेकडून क्लोरिनच्या गोळ्या/ थेंब मिळतात, ते प्यायच्या पाण्यात टाकल्याने पाणी शुद्ध होण्यास मदत होते. पाण्यात सुंठेचा तुकडा वापरावा

विकत मिळणाऱ्या पाण्याच्या बाटल्या चांगल्या असतात. परंतु हल्ली तिथेही कधी कधी भेसळ असते. पावसाळ्यातील नवे पाणी बाधते. लोकांना सर्दी-पडसे याचा त्रास होत राहतो. तो टाळण्यासाठी म्हणून पाण्यात (पिंपात) सुंठेचा एक तुकडा घालावा, तो दर तीन-चार दिवसांनी बदलावा. अन्न पावसाळ्यात पचायला हलका व प्रमाणशीर असाच आहार असावा. अधिक प्रमाणात घेतलेला आहार जो पचायला कितीही हलका असला तरी अयोग्यच! पचायला हलका आहार म्हणजे अग्निसंस्कार केलेला आहार. लाह्या, भाकरी, चपाती, दूध-भात, पिठले असा आहार. नुसत्या पावापेक्षा त्याचा टोस्ट बनवून खावा. पावसाळ्याच्या सुरुवातीला शरीरात अग्नी कमी प्रमाणात असतो, जो अन्नपचनासाठी आवश्यक असतो. त्यामुळे या ऋतूत पक्वान्ने टाळावीत. मात्र स्वयंपाकाचे पदार्थ तेल- तुपाने मसाल्याचे चमचमीत बनवलेत तरी चालेल. आपण स्वयंपाकात हिंग- मिरी, आलं, लसूण, कडीपत्ता, कोथिंबीर, पुदीना इ. वापरतो, ही सर्व द्रव्ये दीपन-पचन करणारी आहेत. थोडक्यात, म्हणजे अन्नपचनाला मदत करणारी आहेत.माफक तेल माफक तेल वात कमी करणारे आहे तर साजुक तूप, वात व पित्त दोन्ही कमी करणारं आहे. पावसाळ्यात वात व पित्त दोन्ही वाढलेले असते म्हणून जमल्यास अन्नपदार्थ साजुक तुपात करावेत, वनस्पती तुपात नव्हे! तेलातील विशिष्ट घटकामुळे पित्त वाढते आणि वर्षा ऋतू म्हणजे पित्तसंचयाचा ऋतू ! म्हणून तेलात तळलेले पदार्थ या दिवसात खाऊ नयेत. पावसाळ्याच्या सुरुवातीला गरम भजी, बटाटेवडे खावेसे वाटले तरी, प्रमाणात खाल्लेले बरे. अन्यथा असे पदार्थ जास्त खाणे म्हणजे आजारांना निमंत्रणच. दही टाळावे, ताक वापरावे या ऋतूत दही कमी खावे. दह्यामुळे शरीरातील अग्नी मंदावतो, पण ताक याच्या विरुद्ध गुणधर्माचे आहे. म्हणून या दिवसात ताक प्यावे. सुंठ, आलं व सैंधव मीठ घातलेले ताक व दह्याच्या वरचे पाणी नियमित प्यावे. पालेभाज्यांमध्ये माठाची भाजी योग्य. शिवाय दुधी, दोडका, पडवळ, भेंडी अशा वातशामक भाज्या अधिक प्रमाणात घ्याव्यात.जुनी धान्ये उत्तम जुने धान्य पचावयास हलके असते. त्यामुळे या ऋतूत जुने गहू, जुने तांदूळ, जुनी धान्ये (मूग, मटकी, चवळी) वापरावीत. आवळा, लिंबू यांची सरबते उत्तम. ओवा, हळद, मिरी, सुंठ यांची पावडर करुन भाकरी, चपातीत वापरल्यास उत्तम.

# बेकायदा फेरीवाले,अतिक्रमणावर पालिकेद्वारे कारवाई. मुंबई हायकोर्ट निर्देशानुसार तीव्र कारवाईचे पाऊले.

मुंबई/शहामत शेख :- मुंबई महापालिकेने अनाधिकृत फेरीवाल्या विरोधात कारवाईचा धडाका सुरू केला आहे. फेरीवाला मुक्त परिसर मोहिमे अंतर्गत १८ ते २४ जून २०२४ या एका आठवड्यात विविध विभागांच्या ठिकाणी पालिकेने कारवाई पार पाडली. या कारवाई दरम्यान फेरीवाल्याकडून ३हजार साधनसामग्री जप्त करण्यात आले.त्यात ७१३ हातगाड्या १ हजार ३७ घरगुती गॅस सिलेंडर १ हजार २४६ इतर विविध प्रकारच्या साहित्याचा समावेश आहे. मुंबईकरांना पदपथ व रस्त्याचा वापर करत असताना अडथळा करणाऱ्या तसेच अपायकारक उघड्यावर अन्नपदार्थ विक्री करणाऱ्या पालिकेतर्फे सातत्याने कारवाई केली जाते मुंबई नगरातील अनाधिकृत फेरीवाले विरोधात कारवाईच्या समन्वय ठेवण्यासाठी मुंबई पालिका प्रशासन व मुंबई पोलीस यांची संयुक्त बैठक महानगरपालिका आयुक्त यांच्या सभागृहात २७ जून रोजी पार पडली. मुंबई महापालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी अध्यक्षस्थानी होते. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार मुंबईतील अनाधिकृत फेरीवाले बेवारस वाहने, पदपथावरील अतिक्रमणे यावर कठोर कारवाई करावी,अनाधिकृत फेरीवाले मुक्त मुंबई करावी जेणेकरून मुंबई करांना मोकळा श्वास घेता



यावा, तसेच पादचाऱ्यासाठी पदपथ मोकळे करण्यात यावे असे स्पष्ट निर्देश मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी दिले.मुंबईतील नागरिकांना पदपथ सहजपणे वापरात यावे व रस्त्यावरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पदपथ अतिक्रमण मुक्त राहतील या अनुषंगाने उपयोजना करण्याच्या सूचना पालिका आयुक्त गगराणी आणि अतिरिक्त आयुक्त(शहर)डॉ. अश्विनी भिडे यांना दिले आहेत. मुंबईतील पदपथ नागरिकांच्या वापरासाठी नेहमी उपलब्ध असावेत, तसेच आरोग्याच्या दृष्टीने मुंबईकरांना दर्जेदार अन्न मिळावेत, तसेच उघड्यावर व अस्वच्छ रीतीने अन्नपदार्थ विक्रेतावर वचक रहावा, यासाठी सातत्याने ही मोहीम राबविण्यात येईल अशी माहिती उपायुक्त (विशेष ) किरण दिघावकर यांनी दिली.

# महिनाभरासाठी गुंठेवारी लागू भुखंड नियमाधीन करण्यासाठी प्रस्ताव दाखल करण्याचे आवाहन

लातूर/प्रतिनिधी :शहर महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत व हस्तांतरित झालेले भूखंड विकास नियमाधीन करण्यासाठी प्रस्ताव दाखल करण्यास दि.१ ते ३१ जुलै पर्यंत नव्याने संधी देण्यात आली आहे.संबंधितांनी याची दखल घेत असे प्रस्ताव दाखल करून घेत भूखंड नियमित करावेत,असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.

लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील विकास नियमाकुल बाबत गुंठेवारी लागू करण्यात आली होती.त्यानुसार शहर हद्दीतील नागरिकांना आपले हस्तांतरित झालेले व अनधिकृत भूखंड नियमाधीन करण्याची संधी देण्यात आली होती. याची मुदत ऑक्टोबर महिन्यातच संपली होती.त्या विहीत मुदतीत प्रस्ताव दाखल करणे अनेकांना शक्य झाले नाही.त्यामुळे शहरातील अनेक नागरिक गुंठेवारीचा लाभ घेण्यापासून वंचित राहिले होते.ही बाब लक्षात घेता मनपाने आता नव्याने एक महिन्याची संधी दिली आहे.

शासनाचे परिपत्रक क्र.अनबां-१०२०/४८०/प्र.क्र/७९/ २०००/भाग-२० दि.०५/०५/२००१ तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार दिनांक १२ मार्च २०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे,श्रेणीवाढ व नियंत्रण ) अधिनियम २००१ यांच्या कलम ३ मधील पोट-कलम १ मध्ये १ जानेवारी २००१ रोजी या मजकुराऐवजी ३१ डिसेंबर २०२० च्या व गुंठेवारी अधिनियमातील कलम ४(१) या प्रमाणे ठाराव क्र.२०२ दि.०१/०७/२०२४ नुसार गुंठेवारी चालु करण्यासाठी १ जुलै २०२४ ते ३१ जुलै २०२४ पर्यंत (एक महिन्याची) संधी देण्यात आली आहे.

महानगरपालिका हद्दीतील महाराष्ट्र गुंठेवारी विकास(नियमाधीन करणे,श्रेणीवाढ व नियंत्रण ) सुधारीत अधिनियम २०२१ व तसेच लातूर शहर हद्दीतील सद्यस्थितीत मंजूर विकास योजना (सु+वा.क्षे.) प्रमाणे अनाधिकृत भूखंड / हस्तांरित झालेले भुखंड व गुंठेवारी विकास नियमाधीन करण्यासाठी नागरिकांनी प्रस्ताव दाखल करून घेवून नियमीत करावेत असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.

## डॉक्टर्स डे निमित्त मनपा आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती यांचा रुग्ण हक्क संरक्षण समितीच्या वतीने सत्कार



लातूर:- रुग्ण हक्क संरक्षण समिती लातूर जिल्हा शाखेच्या वतीने डॉक्टर्स डे निमित्त महानगरपालिका लातूर येथील आरोग्य विभागाचे कर्तव्यदक्ष आरोग्य अधिकारी डॉ शंकर भारती यांचा पुष्पगुछ देऊन सत्कार केला यावेळी आरोग्य विभागातील शहर व्यवस्थापक डॉ रामेश्वर कलवले, डॉ आतिया कौसर, डॉ रमेश बगडे यांच्या सह शहरातील प्रसिद्ध अस्थीरोग तज्ञ डॉ संतोष बिराजदार यांचा समितीच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला याप्रसंगी रुग्ण हक्क संरक्षण समितीचे संस्थापक अध्यक्ष अँड निलेश करमुडी, जिल्हा अध्यक्ष दिपक गंगणे, जिल्हा सचिव बाबासाहेब बनसोडे, सामाजिक कार्यकर्ते डि उमाकांत, आदी समिती पदाधिकारी उपस्थित होते

# वंचित च्या वतीने लोककल्याणकारी राजा छ. शाहूजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त गुणवंत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

नवी मुंबई / के. एच. हनवते :- दिनांक: २९ जुन २०२४ रोजी वंचित बहुजन अघाडी (गांधीनगर) वार्ड क्र. ८० एमआयडीसी येथे राजा छ. शाहुजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त १० वी आणि १२ वी मधे चांगले यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा जाहीर सत्कार समारंभ समाजसेवक तथा वंचित बहुजन अघाडीचे कार्यकर्ते : आयु. सुनिल भोले यांच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी वंचित चे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष दिलिप (भाई) बंदीचौडे यांच्या प्रमुख उपस्थितीत व त्यांच्या शुभ हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव व शालिय साहित्य वाटप करून राजर्षी छ. शाहूजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सर्व महाराष्ट्रात १० - १२ वी चे निकाल लागले आणि त्या मध्ये दगडकाम, खाण कामगारांची मुले म्हटले की अनेक संकटे समोर येतात..? त्या मध्ये झोपडपट्टी...मधली मुले शाळा किंवा कॉलेज खुप दुर... असते घरची परिस्थिती पाहुन रिक्षा किंवा इतर वाहने परवडत नाहीत.. म्हणून हे विद्यार्थी दोन - दोन किलो मीटर चालत जाऊन किंवा बस ने प्रवास करून आपले शिक्षण पूर्ण करतात आणि आपल्या आई - वडील व विभागाचे नाव उज्वल करत असतात



पण या कडे शासनाचे पुर्णपणे दुर्लक्ष असते..? पण या वर्षी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत मिळावी व त्यांच्या शैक्षणिक अडचणी दुर व्हाव्यात या उद्देशाने वंचित बहुजन आघाडी चे कार्यकर्ते तथा समाजसेवक : महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहीत्य प्रसारक सोशल फाउंडेशन संस्थापक आयु. सुनिल भोले तसेच सामाजिक कार्यकर्ते आयु. दिपक गायकवाड, आयु. सुभाष बलखंडे यांच्या विचारातून आपल्या विभागातील १० - १२ वी उत्तीर्ण विद्यार्थी यांचा वंचित बहुजन आघाडी नवी मुंबई जिल्हाध्यक्ष दिलीप (भाई) बंदीचोडे यांच्या प्रमुख उपस्थितीत व त्यांच्या शुभ हस्ते शालेय साहित्य वाटप करून छ. शाहुजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या वेळी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी आप आपले मनोगत व्यक्त करून उपस्थित मान्यवरांचे धन्यवाद मानले तर संविधान बलखंडे या विद्यार्थ्यांनी छत्रपती शाहू महाराजांच्या जिवन कार्या विषयी व त्यांच्या कार्यकाळा विषयी महत्वपूर्ण माहिती सांगितली या वेळी वंचितचे प्रमुख कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या. या सत्कार समारंभा वेळी प्रमुख उपस्थिती म्हणून वंचित बहुजन आघाडी चे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष दिलीप भाई बंदीचोडे, दिपक पहुरकर, सुनील भोले, सुभाष बलखंडे, दिपक गायकवाड, गौतम चव्हाण, बेलापूर तालुका वंचित चे माजी उपाध्यक्ष : कल्याणराव हनवते, अशोक जमादार, ज्ञानेश्वर जाधव, भगवान चाबुकस्वार, प्रभाकर मनवरे, मयूर कांबळे, आनंद खिल्लारे, संजय घागरे, उद्धव पटेकर, राहुल वाकळे, संविधान बलखंडे ईत्यादी पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच विभागातील नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## केंद्र सरकारचे दि.३०/०४/२०२४ चे अन्यायकारक परीपत्रक रद्द करुन जिल्हयातील उर्वरीत ५ लाख १९ हजार शेतकऱ्यांचा विमा मिळण्याचा मार्ग मोकळा करावा.


केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांची खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी घेतली भेट ड्डे केंद्र सरकारचे दि.३०/०४/२०२४ चे अन्यायकारक परीपत्रक रद्द करुन जिल्हयातील उर्वरीत ५ लाख १९ हजार शेतकऱ्यांचा विमा मिळण्याचा मार्ग मोकळा करावा.



धाराशिव :- दि. ०१/०७/२०२४ रोजी खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी शिवराजसिंह चौहान कृषी व ग्राम विकास मंत्री यांची भेट घेवून दि. ३०/०४/२०२४ रोजीचे केंद्र शासन व कृषी विभाग यांच्या वतीने महाराष्ट्र राज्याकरीता काढण्यात आलेले परीपत्रक रद्द करुन उर्वरीत ३२ महसुल मंडळातील शेतकऱ्यांना विभा तात्काळ वितरीत करणेबाबत कृषी मंत्रालय येथे प्रत्यक्ष भेट घेवून विनंती करण्यात आली आहे. धाराशिव जिल्हयातील ५६०४६८ सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी पिक विमा भरुन आपले सोयाबीन हे पिक संरक्षीत केले होते. धाराशिव जिल्हयात अतिशय अल्प पाऊस झाल्याने २१ दिवस पावसाचा खंड पकडुन धाराशिव जिल्हयातील शेतकऱ्यांना २५ टक्के अग्रीम पोटी २५४ कोटी रुपये एचडीएफसी या पिक विमा कंपनीकडून वाटप करण्यात आले. सप्टेबर व ऑक्टोबर-२०२३ मध्ये झालेल्या पावसामुळे धाराशिव जिल्हयातील शेतकऱ्यांनी पिक विमा कंपनीला पूर्व सुचना दिल्या तो संख्या १ लाख ९२ हजार एवढी आहे. केंद्र शासनाने अचानकपणे दिनांक ३० एप्रिल २०२४ रोजी परिपत्रक काढले जे शेतकऱ्यांवर अन्याय करणारे आहे. नविन परिपत्रकातील तरतुदीनुसार धाराशिव जिल्हयातील पुर्व सूचना दिलेल्या पैकी ३७ हजार ५७४ इतक्याच शेतफऱ्यांना वैयक्तीक नुकसानिपोटी ३९ कोटी ५२ लाख रुपये वाटप करण्यात आले. धाराशिव जिल्हयातील ५७ पैकी केवळ २५ महसुली मंडळात ही मदत देण्यात आली. अद्यापही धाराशिव जिल्हयातील ३२ महसुली मंडळातील एकाही शेतकऱ्यांना वैयक्तीक नुकसानीपोटी एक रुपयाही मदत मिळालेली नाही. केंद्र शासनाच्या ३० एप्रिल २०२४ च्या परिपत्रकामुळे धाराशिव जिल्हयातील पिक विमा भरलेल्या पैकी ०५ पाच लाख १९ हजार शेतकरी हक्काच्या पिक विमा नुकसान भरपाई पासुन वंचित राहणार आहेत. राज्य शासनाने दि. ३१ ऑक्टोबर २०२३ रोजी च्या शासन निर्णयानुसार धाराशिव जिल्हयातील तीन तालुके दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर केले आहेत. त्यानंतर राज्य शासनाने दि. २९ नोव्हेंबर २०२३ रोजी काढलेल्या परिपत्रकानुसार राज्यातील ०१ हजार २१ महसुल मंडळे दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर केलेली आहेत. त्यामुळे धाराशिव जिल्हयातील सर्व महसुल मंडळामध्ये दुष्काळ जाहीर केलेला आहे. व ५० टक्के पेक्षा जास्त पिकाचे नुकसान झाल्याचे मान्य केलेले आहे. मात्र केंद्र शासनाच्या परिपत्रकामुळे धाराशिव जिल्हयातील शेतकऱ्यांवर अन्याय झाला आहे. केंद्र सरकारचे दि. ३०/०४/२०२४ वे अन्यायकारक परीपत्रक रद्द करुन जिल्हयातील उर्वरीत ५ लाख १९ हजार शेतकऱ्यांचा विमा मिळण्याचा मार्ग मोकळा करणेबाबत प्रत्यक्ष भेट घेवून विनंती करण्यात आली.

# अधिवेशन संपण्यापूर्वी राज्यातही येणार पेपरफुटीचा कायदा

मुंबई : राज्याच्या विधीमंडळाचं पावसाळी अधिवेशन सुरु आहे. राज्यामध्ये पेपरफुटीच्या घटना यापूर्वी घडलेल्या आहेत, त्यावरुन सभागृहात विरोधकांनी आवाज उठवला. शिवाय परीक्षेसाठी लागणारी मोठी फीस, नॉर्मलायझेशन यावर विरोधकांनी प्रश्न उपस्थित केले. पावसाळी अधिवेशन



संपण्यापूर्वी राज्याचा पेपर फुटीचा कायदा आणणार, अशी घोषणा राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी सभागृहात केली. सुरुवातीला मुद्दा मांडताना रोहित पवार म्हणाले की, पेपर फुटीबाबत सरकार कायदा करणार आहे का? केंद्राचा कायदा आला त्यांचे कौतुक आहे तसा कायदा इथंही आणावा लागेल. रोहित पवारांना उत्तर देताना फडणवीस म्हणाले की, तलाठी परीक्षेत उत्तर चुकले होते, तिथं घोटाळा झाला नाही. पण आम्ही १ लाख लोकांना पारदर्शी रोजगार दिला आहे. पेपरफुटीचा नरेटिव्ह सेट केला जात आहे, आम्ही एक लाख लोकांना रोजगार दिला हा रेकॉर्ड आहे. पेपरफुटीबाबत कायदा करण्यासाठी आमचा मनोदय आहे, याच अधिवेशनात हा कायदा आणला जाईल, असे फडणवीस म्हणाले. पदभरतीच्या संदर्भातने बोलताना भास्कर जाधव म्हणाले की, आपण म्हणता पेपरफुटी पूर्वीच्या सरकारच्या काळात झाली, पण २०२२-२३ मध्ये अनेक भरतींचा पेपर फुटला, मग त्याला जबाबदार कोण? पेपरफुटी ही कीड आहे ती थांबवली पाहिजे. त्यावर देवेंद्र फडणवीसांनी उत्तर दिले, भास्कर जाधव फेक नरेटिव्ह दाखवत आहेत. युवांमध्ये असंतोष कसा होईल यासाठी फेक नरेटिव्ह केले जात आहे, पुण्यात एक वेबसाईट आहे ती हे पसरवण्याचे काम करते आहे. ती आता एका व्यक्तीने टेकओव्हर केली आहे, मी गृहमंत्री आहे, सर्व गोष्टी माहिती असतात. शांत स्वभाव आहे म्हणून बोलत नाही असे नाही असे फडणवीस म्हणाले. अद्याप अडिच लाख पदे रिक्त : देशमुख तुम्ही म्हणता भरती झाली पण अजून जवळपास अडीच लाख पदे रिक्त आहेत. सरकारमध्ये अजून ३३ टक्के पदे रिक्त आहेत. गृहविभागात ५७ हजार पदे रिक्त असल्याची माहिती अनिल देशमुख यांनी दिल्यानंतर देशमुखांना फडणवीसांनी उत्तर देताना पदभरती तुम्हीच रोखली होती, २००५ नंतर भरतीवर रोख आली होती असे फडणवीस म्हणाले.

# प्रा. गौतम सदावर्ते झाले डॉक्टर

आरेगांव ता. मेहकर : - प्रा. गौतम प्रभाकर सदावर्ते यांना नुकतीच डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छ. संभाजी नगर कडून रसायनशास्त्र या विषयात पीएचडी मिळाली आहे.

केवळ अभ्यास आणि मेहनतीच्या जोरावर प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळेमध्ये गावातच झालेले असुन पदवीच्या शिक्षणासाठी औरंगाबाद येथे जाऊनही आपल्या अभ्यासासाचा व बुद्धीमत्तेचा ठसा उमटवून स्वतःला सिद्ध करत औरंगाबाद मध्ये आलेल्या महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांशी स्पर्धा करत आपले शैक्षणिक यश नंबर एक वरच ठेवले. अत्यंत हलाखीची परिस्थिती असताना परिस्थिती चे कारण न दाखवता अर्धवेळ काम करून पुर्णवेळ अभ्यासावर लक्ष केंद्रित करून औरंगाबाद येथुनच पदव्युत्तर शिक्षण पुर्ण केले. कोणत्याही प्रकारच्या अत्याधुनिक सुविधेचा उपयोग न करता केवळ अभ्यासाच्या जोरावर स्वतः ला घडवण्याचे काम डॉ गौतम प्रभाकर यांनी केले. आर्थिक परिस्थिती व भौतिक सुखाचा विचार केला तर अत्यंत बिकट परिस्थिती असताना ही शैक्षणिक कामगिरी ही नजरेत भरणारीच केली. पदव्युत्तर शिक्षण झाल्यानंतर गौतम सदावर्ते यांनी नेट व जे आर एफ पात्रता चाचणी पास करून ऐतिहासिक यश मिळवले. विशेष म्हणजे परिसरातील ते पहिले नेट व जे आर एफ उत्तीर्ण गुणवंत ठरले. पुढे स्वतः ला सिद्ध करत त्यांची नामांकित महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून नियुक्ती सुद्धां झाली. केलेल्या मेहनतीचे त्यांना फळ वारंवार मिळत गेले. प्राध्यापक झाले, आर्थिक सक्षम झाले तरीही त्यांनी अभ्यासाचा व ज्ञानाचा छंद कमी केला नाही. प्राध्यापक म्हणून रुजू झाल्यावरही त्यांनी आपले ज्ञानार्जन सुरूच ठेवले. याचेच फलित म्हणून डॉ गौतम सदावर्ते यांना पीएचडी डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठाकडून डॉ व्हि. बी. जागृत यांच्या मार्गदर्शनाखाली बहाल करण्यात आली. गौतम सदावर्ते यांची आज आर्थिक परिस्थिती सुधारली तरीही अभ्यासासासोबत त्यांनी फुले शाहु आंबेडकर विचारधारा व त्यांचे कार्य याला कधीच खंड पडू दिला नाही. प्राध्यापक म्हणून काम



करताना ही त्यांनी फुले शाहु आंबेडकर यांचे विचार व चळवळ समाजामध्ये कशी रुजवता येईल यावरच काम करत आहेत. नोकरी करत असताना सामाजिक व वैचारिक चळवळीचे काम करता येत नाही असे कारण सांगणाऱ्या लोकांना ही चपराक आहे. कारण कोणतेही कारण समोर न करता कोणत्याही वैचारिक कामात स्वतः समोर येणारे डॉ गौतम सदावर्ते आहेत. डॉ गौतम सदावर्ते यांनी केलेल्या मेहनत व अभ्यासामुळे त्यांनी त्यांचे नाव लौकिक केलेच परंतु त्यांच्या या यशामुळे गावाचेही नाव उज्वल झाले. डॉ गौतम प्रभाकर सदावर्ते यांच्या यशाबद्दल सर्व स्तरावरून कौतुक व अभिनंदन होत आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE